# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

कामगार विभाग, प्रकाशगड, प्लॉट जी-९,
बांद्रा (पू.), मुंबई- ४०० ०५१.
दूरध्वनी क्र. २६४७ २१३१ / २६४७ ४२११.

क्र.कामगार विभाग/ब/ ३२५७८

दिनांक :१९.९.२००६

## परिपत्रक

विषय : महावितरण कंपनी अंतर्गत वार्षिक नाट्यस्पर्धा.
संदर्भ : म.रा.वि.मंडळ सूत्रधारी कंपनीचे परिपत्रक क्र. काऔसंअ/ब-क्री.ना /३३९३५ दि २४.१०.२००५.

मा.व्यवस्थापकीय संचालक (महावितरण) यांनी महावितरण कंपनी अंतर्गत विविध स्तरावर नाट्यस्पर्धांचे आयोजनबाबत खालीलप्रमाणे मंजुरी दिलेली आहे.

१) आंतरपरिमंडळीय नाट्यस्पर्धा यजमान कल्याण परिमंडळतर्फे ऑक्टोबर - २००६ च्या दुस-या आठवड्यात आयोजित करण्यात येतील तत्पूर्वी सर्व परिमंडळांनी आंतरमंडलीय पातळीवरील नाट्यस्पर्धा अयोजित करून प्रथम क्रमांक प्राप्त नाटकाची प्रवेशिका विहीत नमुन्यातील प्रपत्रात मुख्य अभियंता, कल्याण परिमंडळ यांचेकडे दि. ०५/१०/२००६ पर्यंत अथवा त्यापूर्वी पोहचेल अशा बेताने पाठवावी.

२) आंतरमंडलीय तसेच आंतरपरिमंडळीय पातळीवरील नाट्यस्पर्धेत भाग घेणा-या नाट्य संघास नाटकाचा सराव व सादरीकरणासाठी अनुदान रक्कम रु. १५,०००/- (रु. पंधरा हजार फक्त)

३) नाट्यस्पर्धा आयोजनासाठी खर्चाची तरतूद.

अ) आंतरमंडलीय नाट्यस्पर्धेसाठी यजमान मंडलास नाट्यगृहाचे भाडेपोटी प्रति नाटक अनुदान रक्कम रु.७,०००/- (रु. सात हजार फक्त)

ब) आंतर परिमंडळीय नाट्यस्पर्धेसाठी यजमान परिमंडळास नाट्यगृहाचे भाडेपोटी प्रति नाटक अनुदान रक्कम रु.७०००/-(रु. सात हजार फक्त)

४) आंतरमंडलीय नाट्यस्पर्धेसाठी यजमान मंडलास नाटक सादरीकरण परवाना शुल्क, परीक्षकांचे मानधन, कलावंतानाचे स्नेहसंमेलन, नाट्यस्पर्धा उद्‌घाटन व पारितोषिक वितरण सोहळा इत्यादिसाठी अनुदान रक्कम रु. ३०,०००/- (रु तीस हजार फक्त).

D:\kam B on\natya kreeda\paripatrak.doc

सन २००७-०८ पासून आंतरमंडलीय नाट्यस्पर्धा प्रतिवर्षी दि. २१ ऑगस्ट पर्यंत अथवा त्यापूर्वी आयोजित करुन प्रथम क्रमांक प्राप्त नाटकाची प्रवेशिका वेळोवेळी नियोजित यजमान परिमंडळाकडे दि. २५ ऑगस्ट पर्यंत पाठविणे आवश्यक राहील.

तसेच आंतर परिमंडळीय नाट्यस्पर्धा प्रतिवर्षी दि. २५ सप्टेंबर पर्यंत आयोजित करावी.

मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी

प्रेषण यादीप्रमाणे :

१) अधीक्षक अभियंता पर्यंत

२) सर्व उप-मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी

३) सर्व औद्योगिक संबंध अधिकारी

४) सर्व कामगार अधिकारी.

D:\kam B on\natya kreeda\paripatrak.doc